## निवडक



मोरजी : यशवंत विद्यार्थ्यांसोबत शिक्षिका वैष्णवी जोशी व इतर

### मोरजी नाट्यारंभ स्कूल ऑफ आर्टची गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा सत्रात यश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १६ :** मोरजी नाट्यारंभ स्कूल ऑफ आर्टची अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या नोव्हेंबर परीक्षा सत्रात यश प्रारंभिक ह्या परीक्षेत एकूण २८ विद्यार्थ्यांन पैकी २% विद्याथी प्रथम श्रेणीत तर १ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण. प्रवेशिका प्रथम परीक्षेत २ पैकी १ प्रथम तर १ व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण प्रारंभिक परिक्षेत ईश्वरी प्रसाद ताटकर ही नाट्यारंभ मध्ये प्रथम तर स्वामी विवेकानंद सोसायटी या केंद्रात द्वितीय.
सविस्तर निकाल - प्रारंभिक-प्रथम श्रेणी ईश्वरी ताटकर, इशानी ताटकर, आर्या परब, दुर्वा गवंडी, याचना मयेकर, नभा शेटगावकर, रिध्वी पेडणेकर, गौरी येशी, श्रुष्टी सावंत, साईच्छा चोडणकर, युक्ता कोरगावकर, स्वरज्ञा पुरखे, लावण्या पेडणेकर, चेतना शेट कोरगावकर, प्रीशा कोरगावकर, समीक्षा जाधव, सुरवी जोशी, आदीशा पेडणेकर, लक्षिका चोडणकर,नेहा कोरगावकर, नंदिशा गावकर, स्वरा शेटगावकर, श्रीया परब, अवनी परब,सुपर्णा केरकर,अनन्या वडार,विहा सावळ देसाई  कनक हरमलकर ही द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण प्रवेशिका पूर्ण परीक्षेत सौरव पोके प्रथम, व दीपाली चंदन शेटगावकर द्वितीय मुलींना मार्गदर्शन वैष्णवी जोशी यांचे होते.तसेच गुरू नृत्यचंद्रीका संयोगीता पाटील ह्यांचे विशेष आभार संस्थेच्या वैष्णवी जोशी यांनी मानले.

---

### मनदेव फाउंडेशन सालीगावतर्फे 'व्हॅलेंटाईन डे' साजरा



■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. १६ :** मनदेव फाउंडेशन सालीगावतर्फे व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने पेडणे येथील स्नेह ज्येष्ठ नागरिक होमला मनदेव या बिनसरकारी संस्थेन भेट देऊन त्यांना कडधान्य व इतर साहित्य वाटप केले.
यावेळी एनजीओ चे बिन सरकारी संस्थेचे सदस्य होते मनदेव फाउंडेशनच्या संचालिका प्रिया  राठोड तसेच इतर सदस्य उपस्थित होते. यावेळी केक कटिंग चा कार्यक्रम पार पडला. स्नेह जेष्ठ नागरिक सोबत केक कापून व्हेलटाईन डे साजरा करण्यात आला.

---

### हरमल येथील रवळनाथ देवाचा आज वर्धापनदिन, महाप्रसाद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १६ :** येथील ग्रामदैवत श्री देव रवळनाथ पंचायतन देवस्थानच्या २६ व्या वर्धापनदिन सोहळ्यात सोमवार दि. १७ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम तसेच दुपारी २ ते ४ पर्यंत महाप्रसाद होणार असल्याचे देवस्थान समितीने कळविले आहे.
यानिमित्त सकाळी ८ वा प्राकारशुद्धी, श्री देव महादेवाकडे लघुरुद्र महापूजा, लघुरुद्र स्वाहाकार, महाबलिदान, महापूर्णहुती, नैवेद्य महाआरती, महागान्हाणे, तीर्थप्रसाद, ब्राह्मण संतरपण, ब्राह्मण संभावना, आशीर्वाद व सर्व भाविकांना महाप्रसाद (दुपारी २ ते ४ पर्यंत ) होईल.
त्यानंतर संध्या ४ ते ६ पर्यंत स्थानिक भजनी कलाकारांचा भजन कार्यक्रम, आयोजन नरेश राधाकृष्ण नाईक यानी केलं आहे. संध्याकाळी ७ वाजता सुहासिनीच्या जोडव्यासहित श्रींची पालखी मिरवणूक, रात्री १० वा नाटक स्त्री चारित्रच महान, सादरकर्ते श्री रवळनाथ भूमिका दशावतारी नाट्य मंडळ, देऊळवाडा हरमल यांचे आहे. सदर नाटक, मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यांनी पुरस्कृत केले आहे. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे व श्री कृपेस पात्र व्हावे असे आवाहन केले आहे.

---

### दिल्ली कॅपिटल्सचा शेवटच्या चेंडूवर विजय



**वडोदरा, दि. १६ :** शनिवारी महिला प्रीमियर लीग मध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात एक रोमांचक सामना खेळवण्यात आला. शेवटच्या चेंडूवर २ धावा काढत दिल्लीने मुंबईचा २ विकेट्सने पराभव केला. संघाने २० व्या षटकात १० धावांचा पाठलाग केला.
दिल्लीने वडोदराच्या कोटाम्बी स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबईचा संघ १९.१ षटकांत १६४ धावांवर बाद झाला. दिल्लीने २० षटकांत ८ गडी गमावून लक्ष्य गाठले. मुंबईकडून नताली सिव्हर ब्रंटने ८० धावा केल्या, पण ही धावसंख्या तिच्या संघाला जिंकण्यासाठी पुरेशी नव्हती. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, मुंबईने पॉवरप्लेमध्ये दोन विकेट गमावल्या. यास्तिका भाटिया ११ धावा काढून बाद झाली आणि हेली मॅथ्यूज खाते न उघडता बाद झाली. येथून, हरमनप्रीत कौरने नताली सायव्हर ब्रंटसोबत ७७ धावांची भागीदारी केली. २२ चेंडूत ४२ धावा करून हरमन बाद झाली. तिने ३ षटकार आणि ४ चौकार मारले. सिव्हर ब्रंट पुन्हा अँक एंडवर उभी राहिली, पण कोणताही फलंदाज तिच्याशी सामना करू शकला नाही. संघाने शेवटच्या ८ विकेट ५९ धावांत गमावल्या. सिव्हर ब्रंट ८० धावा करून नाबाद राहिली. संघाने १९.१ षटकांत १६४ धावा केल्या. दिल्लीकडून ॲनाबेल सदरलँडने ३ आणि शिखा पांडेने २ विकेट घेतल्या.
१६५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात झटपट झाली. शेफाली वर्माने फक्त १८ चेंडूत ४३ धावा केल्या. तिला हेली मॅथ्यूजने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. तिच्यानंतर मेग लॅनिंगने १५, जेमिमा रॉड्रिग्जने २, ॲनाबेल सदरलँडने १३ आणि ॲलिस कॅप्सीने १७ धावा केल्या. त्यानंतर निक्की प्रसादने सारा ब्राइससह डावाची सूत्रे हाती घेतली. ब्राइसने १० चेंडूत २१ धावा केल्या. निक्कीने ३३ चेंडूत ३५ धावा केल्या, ती शेवटच्या षटकात बाद झाली पण तिने तिच्या संघाला विजयाच्या जवळ आणले.

# 'आयपीएल २०२५'चा २२ मार्चपासून थरार

## पहिला सामना केकेआर आणि आरसीबी ६५ दिवसांत ७४ सामने : वेळापत्रक जाहीर

**मुंबई, दि. १६ :**

आयपीएल २०२५ चे वेळापत्रक १६ रोजी जाहीर करण्यात आले आहे. चाहत्यांची प्रतीक्षा संपली आहे. ही स्पर्धा २२ मार्चपासून सुरू होत आहे. ही स्पर्धा १३ ठिकाणी खेळवली जाईल. पहिला सामना केकेआर आणि आरसीबी यांच्यात खेळला जाईल. हा सामना कोलकाता येथे खेळला जाईल. याशिवाय, दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाणार आहे. त्याचबरोबर ५ वेळचे विजेते चेन्नई सुपर आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना २३ मार्च रोजी खेळला जाईल. दोन्ही संघांचे चाहते प्रचंड आहेत. स्पर्धेचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे खेळला जाईल. या स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जातील.

२३ मार्च रोजी पहिला सामना एसआरएच आणि आरआर यांच्यात खेळला जाईल. यानंतर, दुसरा सामना चेन्नई आणि मुंबई यांच्यात संध्याकाळी ७.३० वाजता खेळला जाईल. या हंगामात लीग टप्प्यात सीएसके आणि चेन्नई दोनदा आमनेसामने येतील. त्याचवेळी, ७ एप्रिल रोजी आरसीबी आणि मुंबई यांच्यात फक्त एकच लीग सामना खेळला जाईल. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. आयपीएल २०२५ चा अंतिम सामना २५ मे रोजी खेळला जाईल. सुरुवातीचे आणि अंतिम सामने दोन्ही कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे होतील.

**स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जाणार -**

ही जगप्रसिद्ध लीग १३ शहरात आयोजित केली जाईल. आयपीएल २०२५ मध्ये ६५ दिवसांत एकूण ७४ सामने खेळवले जातील. आयपीएल २०२५ मध्ये, लीग सामने २२ मार्च ते १८ मे दरम्यान खेळवले जातील. यानंतर, २०, २१, २३ आणि २५ मे रोजी प्लेऑफ सामने आयोजित केले जातील आयपीएल २०२५ मध्येही गेल्या वर्षीप्रमाणेच फॉरमॅट आहे. या दोन महिन्यांच्या स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज, मुंबई इंडियन्स, कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, सनरायझर्स हैदराबाद, गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स, पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स हे १० आयपीएल संघ विजेतेपद जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील.

**आयपीएल २०२५ स्पर्धेचे स्वरूप -**

आयपीएल २०२४ प्रमाणेच फॉरमॅट आहे. त्यानुसार १० संघांची दोन गटात विभागणी केली



आहे. प्रत्येक संघ लीग टप्प्यात १४ सामने खेळेल. पॉइंट टेबलमधील अव्वल दोन संघ पहिल्या क्वालिफायरमध्ये भिडतील, तर तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकाच्या संघांमध्ये एलिमिनेटर सामना खेळला जाईल. पहिल्या क्वालिफायरमध्ये पराभूत संघ आणि एलिमिनेटरमध्ये जिंकणारा संघ दुसऱ्या क्वालिफायरमध्ये भिडेल. येथील विजेता संघ पहिल्या क्वालिफायरमधील विजेत्या संघाविरुद्ध अंतिम फेरीत पोहोचेल.

**संघांच्या कर्णधाराची घोषणा अद्याप बाकी**

लखनौ सुपर जायंट्स, पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अलीकडेच त्यांचे कर्णधार जाहीर केले. २७ कोटी रुपयांना करारबद्ध झालेला ऋषभ पंत सुपर जायंट्सचे नेतृत्व करेल तर २६.७५ कोटी रुपयांना निवडलेला श्रेयस अय्यर किंग्जचे नेतृत्व करेल. आरसीबीने रजत पाटीदारला त्यांचा नवीन कर्णधार म्हणून घोषित केले. फक्त दोन संघ दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांनी अद्याप आयपीएल २०२५ साठी त्यांच्या कर्णधाराची घोषणा केलेली नाही.

यावेळी ६५ दिवसांत ७४ सामने खेळवले जातील. १८ मे पर्यंत ७० लीग स्टेज सामने होतील, ज्यात १२ डबल हेडरचा समावेश असेल. म्हणजे १२ वेळा एका दिवशी २ सामने खेळले जातील. अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे होईल. अंतिम सामना २५ मे रोजी होईल, क्वालिफायर-२ देखील २३ मे रोजी कोलकाता येथे खेळवला जाईल. गेल्या हंगामातील उपविजेत्या संघ सनरायझर्स हैदराबादचे होम ग्राउंड असलेल्या राजीव गांधी स्टेडियमवर दोन प्लेऑफ सामने देखील होतील. येथे क्वालिफायर-१ २० मे रोजी आणि एलिमिनेटर २१ मे रोजी खेळवला जाईल. २०२४ च्या अंतिम सामन्यात, केकेआरने एसआरएचचा ८ विकेट्सने पराभव करून तिसऱ्यांदा आयपीएल जिंकले. १८ व्या हंगामातील पहिला डबल हेडर २३ मार्च रोजी, स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी होईल. एसआरएच आणि आरआर हैदराबादमध्ये दुपारी ३.३० वाजता आमनेसामने येतील. मुंबई आणि चेन्नई यांच्यातील सामना संध्याकाळी ७.३० वाजता खेळला जाईल. यानंतर, ३० मार्च रोजी डबल हेडर होईल. ५, ६, १२, १३, १९, २० आणि २७ एप्रिल रोजी दररोज दोन सामने होतील. ४, ११ आणि १८ मे रोजी डबल हेडर खेळवले जातील. सर्व डबल हेडर फक्त शनिवारी किंवा रविवारी असतील.

**१३ ठिकाणी १० संघ स्पर्धा करतील.**

१० संघांच्या होमग्राउंड्स व्यतिरिक्त, सामने गुवाहाटी, विशाखापट्टणम आणि धर्मशाला येथेही खेळवले जातील. गुवाहाटी हे राजस्थान रॉयल्स (ठठ) चे दुसरे होम ग्राउंड आहे, संघ येथे २ सामने खेळेल. संघ २६ मार्च रोजी कोलकाता आणि ३० मार्च रोजी चेन्नईशी येथे सामना करेल. धर्मशाला हे पंजाब किंग्जचे दुसरे होम ग्राउंड आहे. संघ येथे ३ सामने खेळेल.

आयपीएल ही भारतातील एक फ्रँचायझी क्रिकेट स्पर्धा आहे. दरवर्षी मार्च ते मे दरम्यान टी-२० स्वरूपात हा सामना खेळला जातो. २००८ मध्ये ८ संघांसह त्याची सुरुवात झाली. अंतिम सामन्यात चेन्नईचा पराभव करून राजस्थानने पहिल्या हंगामाचे विजेतेपद जिंकले. मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांनी सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी ५ जेतेपदे जिंकली आहेत. केकेआर हा ३ जेतेपदे जिंकणारा तिसरा सर्वात यशस्वी संघ आहे.

**चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर १२ दिवसांनी आयपीएल**

चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना ९ मार्च रोजी होणार आहे. यानंतर १२ दिवसांनी आयपीएल सुरू होईल. याचा अर्थ खेळाडूंना योग्य तयारीसाठी २ आठवडेही मिळणार नाहीत. चॅम्पियन्स ट्रॉफी १९ मार्चपासून सुरू होईल. ही स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई येथे होणार आहे. भारताचा पहिला सामना २० मार्च रोजी बांगलादेशविरुद्ध आहे.

# साळ सरकारी प्राथमिक शाळेच्या 'बाजार डे'ला उत्तम प्रतिसाद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. १६ :** साळ हा गाव सुजळळलम सुफलाम असून येथे शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. येथे मेहनती आणि कष्टकरी शेतकरी कुटुंबे राहतात येथील बारमाही पाण्याच्या उपलब्धते मुळे येथील महिला परसबागांची लागवड करतात म्हणून पुरेसा भाजीपाला या गावात उपलब्ध होत असतो. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर प्रत्यक्ष व्यवहार ज्ञान देणे गरजेचे असल्यामुळे बाजार डे च्या उपक्रमातून हे ज्ञान त्यांना देणे गरजेचे आहे, असे बाजार डे च्या उद्घाटन प्रसंगी साळ हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक दीपक पिरणकर यांनी विचार प्रकट केले .

साळ येथील सरकारी प्राथमिक शाळेत बाजार डे उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिक्षक पिरणकर यांच्या हस्ते रिबीन कापून उद्घाटन करण्यात आले यावेळी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गीता राऊत, शिक्षिका अर्पिता राऊत, शीतल नाईक, दिव्या माटणेकर, विधी राऊत त्याचबरोबर हायस्कूलच्या शिक्षिका प्रीता टोपले,



**साळ : येथील सरकारी प्राथमिक विद्यालयातील बाजारात खरेदी करताना पालक.**

आकाश राऊत, खुशाग्नी सावंत, समीक्षा गाड, वडावल येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक वसंत परवार ,शिक्षिका प्रणाली देसाई, कासारपाल विद्यालयाच्या शिक्षिका अनघा गाड, पूनम राणे, शिक्षक मयूर आधी शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांनीही या बाजाराला उपस्थिती लावून प्राथमिक विद्यार्थ्यांना ऊर्जा दिली.

प्राथमिक विद्यार्थ्यांनी दिलेल्या जाग्यावर बसून आनंदात वस्तू विकत विक्रीतून येणारी सुरक्षित ठेवत होती. पालक ही मोठया प्रमाणात उपस्थित राहून खरेदी करीत होते हे पाहून छोट्यांना मजा येत होती. दुपार १२.३० वाजेपर्यंत बाजार आटोपला. प्राथमिक शाळेच्या शिक्षिकांनी उत्तम व्यवस्थापन केले होते. उद्घाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिक्षिका अर्पिता राऊत यांनी तर गीता राऊत यांनी आभार मानले.

# रमाकांत खलप हायस्कूल मांद्रेला गणित दिनानिमित्त तीन बक्षिसे

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मांद्रे, दि. १६ :** विदयाप्रसारक हायस्कूल मोरजी, पेडणे गोवा आणि गोवा राज्य विज्ञान व तंत्रज्ञान परिषद, बार्देश गोवा यांच्या सहकार्याने आयोजित गणित दिनाच्या कार्यक्रमात रमाकांत द. खलप हायस्कूल मांद्रेच्या विद्यार्थ्यांनी तीन महत्त्वाची बक्षिसे जिंकली.

गणित दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यामध्ये त्यांचे प्रात्यक्षिक आणि सादरीकरण अत्यंत कौतुकास्पद ठरले. गणित मॉडेल तयार करण्याच्या स्पर्धेत द्वितीय पारितोषिक - मिश्टी सावंत (इ. ६) आणि शनाया शिरोडकर (इ. ६), पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धेत उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक - अवनी मंद्रेकर (इ. ९) आणि स्वरांगी गवडे (इ. ८) गणित क्विझ स्पर्धेत उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक - शमिका



**मांद्रे : विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत शिक्षकवर्ग.**

आश्वेकर (इ. ८) आणि पियुषा शेट्ये (इ. ९).

या स्पर्धांमध्ये यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना गणित शिक्षिका तृप्ती परब, सुनिता मातोंडकर आणि कला शिक्षक दीपराज फडते यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या निरंतर पाठपुराव्यामुळे विद्यार्थ्यांना या स्पर्धांमध्ये चांगले स्थान प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या समारंभात शाळेचे मुख्याध्यापक श्री. शरद गवडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धांमध्येही असाच उत्कृष्ट परिश्रम आणि यश प्राप्त करण्याचे प्रेरणादायक संदेश दिले. याशिवाय, संस्थेचे अध्यक्ष ॲड. रमाकांत खलप, शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांनी या यशासाठी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनी या स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे आणि त्यांना पुढील शालेय कार्यामध्येही यश मिळवण्याची शुभेच्छा दिल्या.

# सचिन तेंडुलकर मैदानात पुनरागमनासाठी सज्ज

## इंटरनॅशनल मास्टर्स लीगमध्ये इंडिया मास्टर्सची कमान सांभाळणार

**मुंबई, दि. १५ :**

क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर पुनरागमन करत आहे. तो इंटरनॅशनल मास्टर्स लीग (आयएमएल) २०२५ च्या पहिल्या हंगामात इंडिया मास्टर्स संघाचे नेतृत्व करेल. ही स्पर्धा २२ फेब्रुवारी ते १६ मार्च २०२५ पर्यंत चालेल. भारत, श्रीलंका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेतील संघ यात सहभागी होतील. जुन्या क्रिकेट दिग्गजांना पुन्हा खेळताना पाहण्याची संधी मिळेल. या लीगमध्ये युवराज सिंग, सुरेश रैना सारखे अनेक मोठे खेळाडूही खेळतील.

सचिन तेंडुलकर क्रिकेटच्या मैदानावर परतण्यास सज्ज आहे. तो आयएमएल २०२५ मध्ये इंडिया मास्टर्स संघाचा कर्णधार असेल. ही स्पर्धा पुढील आठवड्यात, २२ फेब्रुवारी रोजी सुरू होईल आणि १६ मार्चपर्यंत चालेल. क्रिकेट प्रेमींसाठी ही एक



सुवर्णसंधी असेल जेव्हा त्यांना त्यांचे आवडते जुने खेळाडू पुन्हा एकदा खेळताना दिसतील. भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी हे एखाद्या भेटवस्तूपेक्षा कमी नाही. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर भारतीय संघाचे नेतृत्व करेल. त्याच्यासोबत युवराज सिंग, सुरेश रैना आणि अंबाती रायुडूसारखे दमदार फलंदाजही असतील.

इरफान पठाण आणि युसूफ पठाण त्यांच्या अष्टपैलू क्षमतेने संघाला बळकटी देतील. नमन ओझा यष्टीरक्षकपदाची जबाबदारी सांभाळेल. गोलंदाजीत विनय कुमार आणि धवल कुलकर्णीसारखे अनुभवी गोलंदाज आहेत. स्टुअर्ट बिन्नी, शाहबाज नदीम, राहुल शर्मा, पवन नेगी, गुरकीरत सिंग मान आणि अभिमन्यू मिथुन हे खेळाडू देखील संघाचा भाग आहेत. हा एक मजबूत संघ आहे जो जुन्या प्रतिस्पर्ध्यांना कट्टरपणे टक्कर देतील. इंडिया मास्टर्स टीम

सचिन तेंडुलकर (कर्णधार), युवराज सिंग, सुरेश रैना, अंबाती रायुडू, युसूफ पठाण, इरफान पठाण, स्टुअर्ट बिन्नी, धवल कुलकर्णी, विनय कुमार, शाहबाज नदीम, राहुल शर्मा, नमन ओझा, पवन नेगी, गुरकीरत सिंग मान, अभिमन्यू मिथुन. श्रीलंका मास्टर्स संघकुमार संगकारा (कर्णधार), रोमेश कालुविथरणा, अशन प्रियांजन, उपुल थरंगा, नुवान प्रदीप, लाहिरू थिरीमन्ने, चिंताका जयसिंघे, सीकुगे प्रसन्ना, जीवन मेंडिस, इसुरू उदाना, धम्मिका प्रसाद, सुरंगा लकमल, दिलरुवान परेरा, असेला गुणरत्ने, चतुरंगा डी सिल्वा.

# आमोणकर विद्यामंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**म्हापसा : स्नेहसंमेलन नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. १६ :** येथील जी. एस. आमोणकर विद्यामंदिरात पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस समारंभाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. विद्या जांबोटकर यांना आमंत्रित केले होते. तसेच शाळेचे अध्यक्ष माननीय ॲड. संजय उसगावकर सर, शाळेचे माननीय व्यवस्थापक मोहन कौल, शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा दळवी,उपमुख्याध्यापिका झेना व्हीएगस, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष नवनाथ केरकर, उपाध्यक्ष विशांत कोरगावकर व इतर सभासद तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनाचे प्रमुख आकर्षण म्हणजे आपल्या भारत देशातील विविध राज्यातील लोकनृत्य असा विषय ठेवण्यात आला होता. आणि राष्ट्रीय एकात्मता लक्षात घेऊन ही स्नेहसंमेलनाचे पूर्ण नियोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण केले व उपस्थित वर्गाकडून वाहवा मिळविली. स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या शिक्षकांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी व पालकांसमोर आपले बहुमोल असे विचार मांडले. शाळेचे अध्यक्ष ॲड. संजय उसगावकर सर यांनीही पालकांना संबोधून विचार मांडले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पूजा दळवी मॅडम यांनी वार्षिक अहवाल मांडला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देणार आली. चत्रा सोहनी व सावित्री घाडी यांनी केले. तर आभार प्रदर्शन दीपाली नाईक यांनी केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 165 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .